|| श्री गणेशाय नमः ||

हरि:ॐ

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

# तुळशी विवाह
## आणि
# तुळशी माहात्म्य



तुकाराम बुक डेपो मुंबई - ४.

# तुळशीविवाह
# आणि
# तुळशीमाहात्म्य

तुळशीविवाह विधी, विवाह कथा,
मंगलाष्टके, तुळशीची उत्पत्ती आणि
तिचे उपयोग यांची सविस्तर माहिती

संकलक
विद्यानंद भारती

Astrologers
Proprietor

**मूल्य : २५/- रुपये**

तुकाराम बुक डेपो, मुंबई ४०० ००४.

नवीन आवृत्ती : २०१३

प्रकाशक :
महेंद्र मधुकर कस्तुर
तुकाराम बुक डेपो,
९७, सी. पी. टँक रोड,
मुंबई - ४०० ००४.
दूरध्वनी : २२४२१६८९

अक्षरजुळणी :
अक्षय फोटोटाइपसेटर्स
१-चित्रकूट सहनिवास,
डॉ. आंबेडकर मार्ग,
ठाणे (पश्चिम) - ४०० ६०१.

मुद्रण स्थळ :
शिवानी प्रिंटर्स
खाडिलकर मार्ग,
गिरगाव, मुंबई - ४०० ००४.



# तुलसीविवाह

## तुलसीविवाह

प्रत्येक हिंदूच्या दारात तुलसीवृंदावन असते. स्त्रियांनी त्या तुलसीला रोज पाणी घालावे, प्रदक्षिणा घालाव्यात, पूजा करावी, तुलसीसमोर रांगोळी काढावी व सायंकाळी दिवा लावावा. लहान मुलामुलींनी तुळशीजवळ बसून रामरक्षा म्हणावी.

श्रीविष्णूला तुळस अत्यंत प्रिय आहे. तुळशीच्या पानाने त्याची पूजा केली असता पुष्कळ व्रते, यज्ञ, जप ह्या गोष्टी केल्याचे फळ लाभते.

## तुलसीविवाह विधी

दरवर्षी कार्तिक शुद्ध द्वादशीपासून पौर्णिमेपर्यंत तुलसीविवाह करण्याची प्रथा आहे. पण मुख्यतः द्वादशी या तिथीस तुलसीविवाह साजरा करतात. विवाहाच्या दिवशी तुलसीवृंदावन सारवून स्वच्छ करून रंग वगैरे लावतात. वृंदावनावर चारी बाजूंना स्वस्तिक चिन्ह काढून समोरील बाजूस **'राधा-दामोदर प्रसन्न'** असे लिहितात.

वृंदावनात तुळशीभोवती जे आळे असते त्यात चिंचा, आवळे, करंडा-फणी हे ठेवावे. तुळशीवर बाशिंग बांधावे. वृंदावनाभोवती ऊस उभे करून

त्यांचा सुंदर मांडव तयार करून सभोवती केळीचे खांब, आंब्याच्या डाहळ्या, झेंडूच्या फुलांच्या माळा बांधाव्यात. वृंदावनाभोवती सुंदर रांगोळी काढावी.

## पूजा साहित्य

हळद-कुंकू, गुलाल, रांगोळी, तांब्या, ताम्हन, पळीभांडे, घंटा, पाट, गंध, अक्षता, सुवासिक फुले, उदबत्ती, कापूर, धूप, अत्तर, पंचामृत (दूध, दही, तूप, मध, साखर) कापसाची वस्त्रे, निरांजन, तूप, फूलवात, समई, गोडेतेल, वाती, नारळ, अख्ख्या सुपाऱ्या ५, विड्याची पाने, यज्ञोपवीत, खण, खोबऱ्याच्या वाट्या, हळकुंडे, नैवेद्यासाठी फराळाचे पदार्थ, फळे, लाह्या, बत्तासे, आवळे, चिंचा, करंडा-फणी, दक्षिणा इत्यादी साहित्य तयार ठेवावे.

## पूजा-विधी

श्रीमन् महागणाधिपतये नमः हा मंत्र म्हणून 'तुलसीसहित श्रीगोपालकृष्ण प्रीत्यर्थं विवाहोत्सांगध्यानावहनादि षोडशोपचार पूजां करिष्ये' असा संकल्प सोडावा. नंतर कलश, शंख, घंटा व दीप यांची पूजा करावी. ध्यान करावे व खालील श्लोक म्हणावा -

**शान्तकारम् भुजगशयनम् पद्मनाभं सुरेशं।**
**विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम्।**
**लक्ष्मीकान्तं कमलनमनम् योगिभिर्ध्यानगम्यम्।**
**वन्दे विष्णुं भवभयहरं सर्व लोकैकनाथम्।**

यानंतर गोपाळकृष्ण ताम्हनात घेऊन तुलसी आणि गोपाळकृष्ण यांची पूजा करावी. त्यानंतर श्रीतुलसीची प्रार्थना करावी.

**दिव्यरूपधरा देवी दिव्याभरणभूषिता।**
**पद्मकल्हारवदना वरामय चतुर्भुजा ॥१॥**
**शुभाशुभ परित्यागी दिव्यगंधानुलेपना।**
**श्यामा विशालवदना नीलकुंचितभूर्धजा ॥२॥**



**स्फुरत्कुंडलसंयुक्ता पूर्णचंद्रनिभानना।**
**केयुरहारविलसद् रत्नमाला विषोज्ज्वला ॥३॥**

हे ध्यानमंत्र म्हणताना एका भांड्यात दूध घेऊन तुलसीवृंदावनात त्याची धार धरून तीन प्रदक्षिणा घालाव्यात.

यानंतर 'गोविंदा गोविंदा' असा त्रिवार नामघोष करावा. देवपूजेतील बाळकृष्णाची मूर्ती आणून देवाचे तोंड तुलसीवृंदावनाकडे करावे. जमलेल्या मंडळींना अक्षता वाटाव्यात. मध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणावीत. ही मंगलाष्टके म्हणताना विवाहप्रसंगी जशी मंगलाष्टके म्हणतात तशीच सुरुवात व अखेर करावी.

## मंगलाष्टके

**॥स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदं॥ बल्लाळी मुरुड विनायकमहं चिंतामणिं स्थेवरं॥ लेण्याद्रिं गिरिजात्मजं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरं॥ ग्रामो राजण संस्थितो गणपतिः कुर्यात् सदा मंगलम् ॥१॥**

**लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वंतरिश्चंद्रमा। गावःकामदुधाःसुरश्वरेगजो रंभादिदेवांगनाः अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुःशंखोऽमृतं चांबुधे। रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्वन्तु वो मंगलम् ॥२॥**

**कस्तूरीतिलकं ललाटपटले वक्षःस्थले कौस्तुभं। नासाग्रे वर मौक्तिकं करतले वेणुःकरे कंकणम्॥ सर्वांगे हरिचंदनं सुललितं कंठेच मुक्तावली। गोपस्त्री परिवेष्टितो विजयते कुर्यात् सदा मंगलम् ॥३॥**

**गंगा सिंधु सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा। कावेरी शरयूमहेंद्रतनया चर्मण्वती वेदिका॥ क्षिप्रा वेत्रवती**

महासुरनदी ख्याता च या गंडकी। पूर्णाः पूर्णजलैः समुद्रसहिताः कुर्वंतु वो मंगलम् ॥४॥

रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे। रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः॥ रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोस्म्यहं। रामेचित्तलयः सदा भवतु मे कुर्यात् सदा मंगलम् ॥५॥

कंठे यस्य विराजते हि गरलं शीर्षे च मंदाकिनी। वामांके गिरिजाननं कटितटे शार्दूलचर्मांबरम्॥ माया यस्य रुणद्धि विश्व मखिलं तस्मै नमः शंभवे। सस्थाणुः स्थिर भक्तियोग सुलभः कुर्यात् सदा मंगलम् ॥६॥

मोठे दोंद कटीं फणींद्र बरवा भाळीं शशी शोभतो। हस्तीं अंकुश लड्डु पद्म परशू दंतीं हिरा झळकतो॥ पायीं पैंजण घागरीं रुणझुणी प्रेमें बरा नाचतो। ऐसा देव गणेश तो वधुवरां कुर्यात् सदा मंगलम् ॥७॥

श्रीवत्सांकित भूषणें तुळशिचीं आपाद माळा रुळे।
माथां रत्नकिरीट कौस्तुभ गळां सूर्यप्रभे ना तुळे॥
केयूरांगद कुंडलें सुरचना चौहस्तकीं आयुधें।
लक्ष्मीयुक्त मुरारि तो वधुवरां कुर्वन्तु वो मंगलम् ॥८॥
तदेव लग्नं सुदिनं तदेव
ताराबलं चन्द्रबलं तदेव।
विद्याबलं दैवबलं तदेव
लक्ष्मीपते तेऽतङ्घ्रियुगं स्मरामि॥
सुमुहूर्त सावधान-सावधान



सर्वांनी वृंदावनावर अक्षता टाकून टाळ्या वाजवाव्यात. वाद्यांचा गजर करावा. पूजकाने हातात फुलांच्या दोन माळा घेऊन त्यांपैकी एक गोपळकृष्णाला व एक तुलसीला घालावी. नंतर तुलसीची व श्रीकृष्णाची आरती करावी व प्रार्थना करावी.

प्रसीद मम देवेशी कृपया परया सदा।
अभिष्ट कार्यसिद्धिंच कुरु मे माधवप्रिये॥
देवैसह निर्मिता पूर्व अर्चितासि मुनीश्वरैः।
नमो नमस्ते तुलसि पापहरं हरप्रिये॥

त्यानंतर 'गोविंदा' 'गोविंदा' असा त्रिवार घोष करावा.

सुवासिनींनी तुलसीला हळदकुंकू वाहून शेस, ओटी वगैरे भरावी. दीप लावावा व म्हणावे -

अखंड सौभाग्य वृद्धये तुलसी विवाहांगत्वेन
राधाकार्तिक दामोदर देवताप्रीत्यर्थ दीपज्वालनं करिष्ये।

व उदक सोडून आरती करावी, तुलसीस दाखवावी. ब्राह्मणास गंधफूल, विडा यांच्यासह दक्षिणा द्यावी. लाह्या, बत्तासे, उसाचे कर्वे वगैरे नैवेद्याचा प्रसाद वाटावा.

नंतर कन्यादान विधी म्हणून म्हणावे -

देवीं कनकसंपन्नां कनकाभरणैर्युताम्।
दास्यामि विष्णवे तुभ्यं ब्रह्मलोकजिगीषया॥
मया संवर्धितां यथाशक्त्यालंकृतां इमां तुलसीं देवीं
दामोदराय श्रीधराय वराय तुभ्यमहं संप्रददे

असे यजमानाने म्हणावे. शेवटी प्रार्थना करावी -

उत्तिष्ठोतिष्ठ गोविंद उत्तिष्ठ गरुडध्वज।
उत्तिष्ठ कमलाकान्त वासुदेव नमोऽस्तुते॥

हा विवाह वार्षिक उत्सव म्हणून घरोघरी साजरा करतात. विवाहसमय हा नेहमी गोधूली सायंकालचा असतो. या दिवसापासून चातुर्मास्यासंबंधी विशिष्ट नियम संपतात.

वृंदेने रुक्मिणीचा व श्रीभगवान विष्णूने श्रीकृष्णाचा अवतार घेतला म्हणून या विवाहाला 'राधादामोदर प्रसन्न' असे संबोधून तुलसीविवाह करतात व श्रीकृष्णाशी तिचा विवाह होतो व नंतर चार महिन्यांत इतरांचे विवाह साजरे होतात.

## तुलसी आख्यान

॥श्रीगणेशाय नमः॥ अथ तुळसीआख्यान प्रारंभ। गणेश गौरीचा नंदन। सिद्धिबुद्धीचा दाता पूर्ण। आधीं वंदावा गजवदन। मंगलमूर्ती मोरया ॥१॥ मग नमूं शारदा सुंदरी। बैसोनि आली हंसावरी। तेणें वळली माझी वैखरी। कवित्वालागीं ॥२॥ मग नमूं सद्गुरुमाउली। त्यानें मज कृपा केली। काया माझी शीतळ झाली। आले हृदयीं विज्ञान ॥३॥ मग नमूं व्यासादिक जाण। जे चवदा विद्यांचें निधान। त्यांसी केलें नमन। दोन्हीं कर जोडूनियां ॥४॥ व्यास सांगे जनमेजयालागुन। कथा ऐका पुण्यपावन। तुळसीदेवीचें आख्यान। एकचित्तें श्रवण करावें ॥५॥ तुळसीवृंदावन जयाचे द्वारीं। धन्य धन्य तो प्राणी संसारीं। तयाच्या पुण्या नाहीं सरी। ऐके राया ॥६॥ नित्य जो तुळसीस नमस्कारी। त्यासी देखोनि यम पळे दुरी। विष्णुदूत आदर करीं। तया प्राणियासीं ॥७॥ जे प्राणी तुळसीपूजा करिती। तुळसीसंगें घडे श्रीहरीची भक्ती। हे वार्ता आहे निश्चितीं। असत्य न म्हणावें ॥८॥ तुळसीदेवीची मंजिरी। चढविली श्रीकृष्णाचे शिरीं। धन्य धन्य तो प्राणी संसारीं। ऐसें वदे व्यासऋषी ॥९॥ तुळशीपत्र घालीत कानीं। तया पातकांची होय धुनी। तो माझा भक्त म्हणे शार्ङ्गपाणी। मज आवडी तयाची ॥१०॥ तुळसीवृंदावनींची मृत्तिका। जो कपाळीं लावी टिळका। तो भक्त माझा निका। म्हणे श्रीकृष्ण ॥११॥ जे तुळसीची माळा। प्राणी घालिती गळां। मी स्वरूपसांवळा। आहे तेथें ॥१२॥ ब्रह्मा विष्णु महेश। तिन्ही देव तुळसीस। आतुडती सावकाश। तुळसीपूजनें ॥१३॥ नित्य करी तुळसीपूजन। स्मरणें संतोष पावे श्रीकृष्ण। तेणें होय सुखसंपन्न। धन्य धन्य भक्त माझा ॥१४॥ फुकाची तुळसी पूजिती। तयांसी यमयातना तुटती। बळें घेऊनि जाती। विष्णुदूत वैकुंठीं ॥१५॥ जयासी जाणें वैकुंठासी। तें वैकुंठ आहे तुळसीपासीं। मनीं विश्वासे तुळसी। पूजन करावें ॥१६॥ तुळसीस घालिती उदक। त्या प्राणियासी कैंचें दुःख। सदासर्वकाळ पावे सुख। तुळसीपूजनें ॥१७॥ जो करी तुळसीपूजा। भक्तिभावे गरुडध्वजा। कृष्ण म्हणे केवळ भक्त माझा। अति प्रीती होय ॥१८॥ तुळसीवृंदावन ज्याचे अंगणीं। प्रातःकाळीं दर्शन घडे नित्यनेमीं। त्याच्या पातकांची होय धुनी। तो पुण्यप्राणी जाणावा ॥१९॥ फुकाचें घालिती तुळसीस पाणी। यमदूत सांगती यमालागुनी। बळें विष्णुदूत नेती वैकुंठभुवनी। त्या प्राणियासी ॥२०॥ कुंभीपाक पडिला ओस। प्राणियासी नाहीं दोष। बळें नेती विष्णुदास। आम्हांपासुनीं ॥२१॥ जे ऐकती

तुळसीचें महिमान। तयापासीं अक्षयीं नारायण। सांगे जनमेजयालागुन। ऐक राया ॥२२॥ धूप दीप नैवेद्य आरती। जे तुळसीस नित्य करिती। त्या प्राणिया पुनरावृत्ती। नाहीं कल्पांतीं जाण पां ॥२३॥ तुळसीच्या काष्ठाची करून स्मरणी। रामनाम स्मरत नित्यनेमीं। तो दरिद्री न होय प्राणी। निश्चयेंसी ॥२४॥ जे तुळसीपाशीं सारविती। नित्य घृतदीप उजळिती। तया घराची न सरे संपत्ती। ते केवळ भक्त माझे ॥२५॥ जे तुळसीस विनविती। मनोभावें सेवा करिती। जवळी बैसोनि प्रार्थिती। ते प्राणसखे माझे ॥२६॥ उद्धव म्हणे शार्ङ्गधरू। तुळसीपूजनें उतरे पारू। जे तुळसीस पूजिती अवधारू। काय विचारू तयांचा ॥२७॥ उद्धवासी म्हणे शार्ङ्गपाणी। जे तुळसीची निंदा करिती प्राणी। अधोगती त्यांलागुनी। ते कोडे वेडे होती ॥२८॥ जो प्राणी तुळसीचें मोडितो आळें। त्या प्राणियाचें तोंड काळें। सदा प्राणी तो तळमळे। भाग्य नाहीं तयासी ॥२९॥ जे प्राणी मोडिती तुळसीवृंदावन। यम सांगे दूतांलागुन। कुंभीपाकीं टाका नेऊन। सत्य जाण उद्धवा ॥३०॥ उद्धव म्हणे श्रीपती। पुरुषांची सांगितली गती। आतां स्त्रियांची कैसी रीती। सांगावी स्वामिया ॥३१॥ उद्धवासी सांगे नारायण। ही कथा ऐक एकचित्तेंकरून। तुळसीदेवीचें आख्यान। यथानिगुती ऐक पां ॥३२॥ ज्या नारी तुळसीपूजन करिती। त्या सदा सौभाग्यवती होती। पुत्रपौत्र संपत्ती होय। तुळसीपूजनें



॥३३॥ तुळसीपाशीं चैतन्य वनमाळी। भक्तांसी सांभाळी चंद्रमौळी। ज्या नारी भाव धरोनि प्रातःकाळीं। तुळसीस पूजिती ॥३४॥ ज्या तुळसीपूजा चुकती। पुढिले जन्मीं सौभाग्य न पावती। हा वृत्तांत सांगे श्रीपती। उद्धवा लागूनियां ॥३५॥ ज्या नारी करिती तुळसीपूजन। नित्य त्यांसी माझे ध्यान। म्या ठाव दिधला तया लागुन। वैकुंठासी राहावया ॥३६॥ वैकुंठलोकींची तुळसी। सत्य-मृत्युलोकासी। पातकी उद्धरावयासी। म्यां आणिली निश्चयें ॥३७॥ मृत्यूलोकींचे जन महा अभिमानी। न ओळखिती तुळसीलागोनि। म्हणौनि यम करी जाचणी। त्या प्राणियांसी ॥३८॥ तुळसीमंदिर माहेर। तेथें मी वसे साचार। दुसरा नाहीं विचार। सत्य जाण गा उद्धवा ॥३९॥ तुळसी वनीचें झाड म्हणती। ते झाड नव्हे विष्णुमूर्ती। आपण सांगे ऋषींप्रती। शुक ऐसें सांगतसे ॥४०॥ जो तुळसी पूजी नित्यकाळीं। मी त्याचें बालक तो माझी माउली। तळहाताची साउली। म्यां केली त्यावरी ॥४१॥ तो तरी माझा आत्मसखा। आणि मी त्याचा पाठिराखा। तो मज प्राणाहून अधिक निका। तुळसीपूजनें ॥४२॥ भावें तुळसीप्रदक्षिणा करिती। ते माझे भक्त सखे निश्चितीं। उद्धवा ते मज अतिप्रीती आवडती। मी त्यांचा अंकित ॥४३॥ जो करी तुळसीपूजन। तो माझा चित्तचैतन्य। उद्धवा मी त्यांचा सज्जन। सत्य सत्य जाण पां ॥४४॥ तुळसीची आणि माझी प्रीती। तुळसीपूजन ज्या नारी करिती।

चिरंजीव तयांची संतती। अखंड सौभाग्य तयांसी ॥४५॥ तुळसी मी अभेद्य दोनी। जे हरिकथा करिती याचि नेमीं। त्यांची चुकेल यमजाचणी। ते होती वैकुंठवासी ॥४६॥ तुळसीस जे करिती प्रदक्षिणा। त्याच्या चुकती यमयातना। बळें नेती वैकुंठभुवना।त्या प्राणियांसी ॥४७॥ तुळसीसी घालिती लोटांगण। ते माझे प्रेमळ भक्त जाण। कृष्ण म्हणे इची भक्त करून। उद्धरती प्राणी ॥४८॥ जे प्राणी तुळसीचें करिती लग्न। त्यांचें चुकेल जन्ममरण। ते जाती वैकुंठालागुन। असत्य न म्हणावें ॥४९॥ व्यास सांगें जनमेजया प्रती। जे करिती तुळसीभक्त। तयांसी नाहीं जन्ममरण अंतीं। चिरंजीव ते जाणावे ॥५०॥ स्त्रीपुरुष दोघे जण। करिती तुळसीपूजा एकचित्तें करून। त्यांचे फिटे वांझपण। सांगे वेदव्यास ऋषी ॥५१॥ जे प्राणी तुळसीस घालिती दंडवत। ते माझे भक्त जाण गा सत्य। त्यांचें माझें एकचित्त। म्हणे हृषीकेशी ॥५२॥ तुळसीस बोले जो निंद्य वचन। तो माझा वैरी प्रत्यक्ष जाण। त्याचें हृदय घायें करीन चूर्ण। सत्य जाण उद्धवा ॥५३॥ उणें बोले जो तुळसीस। त्याचा मी करी निर्वंश। श्रीकृष्ण म्हणे उद्धवास। असत्य नव्हे कदाकाळीं ॥५४॥ मजशीं बोलती न्यूनता। त्याची मज नाहीं चिंता। तुळसीस बोलती अन्यथा। ते पावती महापतन ॥५५॥ जो करी तुळसीची पूजा। तो प्रीतीचा भक्त माझा। वैकुंठासी जावया दुजा। मार्ग नसे जाणपां ॥५६॥ तुळसी नांव उच्चारी निशिदिनीं। तो भक्त



माझा शिरोमणी। त्याचिया सत्त्वाची खाणी। उद्धरली आहे ॥५७॥ तेणें षोडशोपचारें पूजा केली। ऐसे म्हणे कृष्णमाउली। लडिवाळपणें आत्मबोली। उद्धवाप्रति बोलतसे ॥५८॥ उद्धव म्हणे देवा श्रीपती। दोन्ही कर जोडूनी करी विनंती। बरी सांगितली गती। पापियाची ॥५९॥ तुळसीकथा ऐके कानीं। कृष्ण म्हणे त्यालागुनी। ठाव केला वैकुंठभुवनीं। त्या प्राणियासी ॥६०॥ फुकाचे घडे तुळसीपूजन। त्याला प्रसन्न मी नारायण। हें देवा तुझें गुप्त देणें। म्हणती उद्धवा ॥६१॥ त्रैलोक्य असे तुळसीजवळ। अठ्ठ्याऐंशीं सहस्र ऋषींचा मेळ। साधुसंतांसहित गोपाळ। तुळसीसन्निध ॥६२॥ जे तुळसी न पूजिती। अज्ञान अभिमाना मानिती। ते मज न ओळखती। त्यांसी नारकप्राप्ती जाणपां ॥६३॥ साक्षात् वैकुंठपाळ तयांसी। नाहीं लटकी वटवट तैसी। जे नाहीं म्हणती तुळसीसी। ते मजसी नेणती ॥६४॥ उद्धवा तूं माझा आवडता भक्त। त्याहून विशेष सांगतों वृत्तांत। जो जाणे तुळसीभावार्थ। तो मला अत्यंत प्रियकर ॥६५॥ मी निर्गुण निराकारू। मज कैंचारे आकारू। मी जाहलों साकारू। भक्तांलागीं ॥६६॥ मज कैचेरें शिखासूत्र। मज नाहीं कुळगोत्र। मज कैंचे इष्टमित्र। निष्कलंक मी असें ॥६७॥ जैसी दोन प्रहरांची साउली। तैसी माया मजमाजी मावली। ही खूण सांगितली। उद्धवा तुज ॥६८॥ कल्पवृक्षाची छाया। तेथें होय मी तृप्ति पावलिया। तैसी भक्त माझी माझिया। जाणगा

उद्धवा ॥६९॥ मज भक्तीनें गोविले। त्याच्या घरीं मी दास्यत्व केलें। धर्माधरीं उच्छिष्ट काढिलें। भक्तिलागीं ॥७०॥ उद्धवा तो माझा भक्तसखा। आणि मी त्याच्या पाठिराखा। सर्वाठायीं नेटका। धर्मानें बांधिलिया ॥७१॥ नित्य भक्तिधर्म ज्याचे घरीं। तो माझा जाण साह्यकारी। मी त्याचा कैवारी। ऐकगा उद्धवा ॥७२॥ उद्धव कृष्णासी काय म्हणे। माझी विनंती स्वामी ऐकणें। एक असे स्वामीस पुसणें। तें सांगावें देवा ॥७३॥ कवणे ठायीं स्वामींचें ठिकाण। तें सांगा आम्हांलागुन। मी पुसतों बालक अज्ञान। सांगिजे स्वामी ॥७४॥ उद्धवा ऐक सावधान। सांगतों माझें ठिकाण। ज्यानें होय समाधान। तुझिया मनाचें ॥७५॥ एक ठिकाण भक्ताचे हृदयकमळीं। दुसरें ठिकाण तुळसीजवळी। तिसरें ठिकाण संतांचे मेळीं। सत्य जाण उद्धवा ॥७६॥ कृष्णमुखींची ऐकोनि वार्ता। उद्धवें चरणीं ठेविला माथा। धन्य धन्य तूं गोपिनाथा। मज सनाथ त्वां केलें ॥७७॥ उद्धवासी सांगे नारायण। सत माझे चित्त चैतन्य। माझें सुखदुःख त्याविण। कोण जाणे ॥७८॥ संत माझे गुरु मी संतांचा चेला। संतांच्या भावा मी भुकेला। त्यांनी माझ्या नामाचा विस्तार केला। नाहीं तर मजला कोण जाणे ॥७९॥ वैकुंठलोकींची तुळसी। संतें आणिली मृत्युलोकासी॥ तुळसी नाम सांगे जनांसी। तेंच नांव माझें ॥८०॥ उद्धवासी सांगे नारायण। तरी तूं माझा भक्तजन। ऐसें हें तुळसीचें आख्यान। विस्तारोनि सांगितलें ॥८१॥ ही कथा करिती जे श्रवण। त्यांचें चुके जन्ममरण। ते



जिवंत पावती वैकुंठभुवन। सत्य जाण उद्धवा ॥८२॥ उद्धव म्हणे घननीळा। तुझी न कळे भाव लीळा। तुळसीपूजा सांगितली सकळा। यथानिगुती ॥८३॥ म्हणे नामा विष्णुदास। ही कथा ऐकती सावकाश। तेणें होय पापनाश। नासती ब्रह्महत्त्या ॥८४॥ हें तुळसीचें आख्यान। रसाळ आहे निरूपण। संत विश्रांत मुनिजन। आदरें परिसिजे ॥८५॥ इति श्रीसुरसभरित तुळसी आख्यान समाप्त॥

श्रीराधाकृष्णार्पणमस्तु॥

श्रीलक्ष्मीनारायणार्पणमस्तु॥ शुभं भवतु॥

## तुलसीकवचम्

श्रीगणेशाय नमः॥ अस्य तुलसीकवचस्तोत्रमंत्रस्य। श्रीमहादेव ऋषिः। अनुष्टुप्छंदः। श्रीतुलसी देवता। मनईप्सितकामनासिद्ध्यर्थं जपे विनियोगः। तुलसी श्रीमहादेवि नमः पंकजधारिणी मे शिरो मे तुलसी पातु भालं पातु यशस्विनी ॥१॥ दृशौ च पद्मनयना श्रीसखे श्रवणे मम। घ्राणं पातु सुगंधा मे मुखं। सुमुखी मम ॥२॥ जिह्वां मे पातु शुभदा कंठं विद्यामयी मम। स्कंधौ कह्लारिणी पातु हृदयं विष्णुवल्लभा ॥३॥ पुण्यदा मे पातु मध्यं नाभिं सौभाग्यदायिनी। कटिं कुंडलिनी पातु ऊरू नारदवंदिता ॥४॥ जननी जानुनी पातु जंघे सकलवंदिता। नारायणप्रिया पादौ सर्वांगं सर्वरक्षिणी ॥५॥ संकटे विषमे दुर्गे भये वादे महाहवे। नित्यं हि संध्ययोः पातु तुलसी सर्वतः सदा ॥६॥ इतीदं परमं गुह्यं तुलस्यः

कवचामृतम्। मर्त्यानाममृतार्थाय भीतानामभयाय च ॥७॥ मोक्षाय च मुमुक्षूणां ध्यायिनां ध्यानयोगकृत्। वशाय वश्यकामानां विद्यायै वेदवादिनाम् ॥८॥ द्रविणाय दरिद्राण पापिनां पापशांतये ॥९॥ अन्नाय क्षुधितानां च स्वर्गाय स्वर्गमिच्छताम्। पशव्यं पशुकामानां पुत्रदं पुत्रकांक्षिणम् ॥१०॥ राज्यायभ्रष्टराज्यानामशांतानां च शांतये। भक्त्यर्थं विष्णुभक्तानां विष्णौ सर्वांतरात्मनि ॥११॥ जाप्यं त्रिवर्गसिध्यर्थं गृहस्थेन विशेषतः। उद्यंतं चंडकिरणमुपस्थाय कृतांजलिः ॥१२॥ तुलसीकानने तिष्ठन्नासीनौ वा जपेदिदम्॥ सर्वान्कामानवाप्नोति तथैव मम सन्निधिम् ॥१३॥ मम प्रियकरं नित्यं हरिभक्तिविवर्धनम्। या सान्मृतप्रजा नारी तस्या अंगं प्रमार्जयेत् ॥१४॥ सा पुत्रं लभते दीर्घजीविनं चाप्यरोगिणम्। वंध्याया मार्जयेदंगं कुशैर्मंत्रेण साधकः ॥१५॥ साऽपिसंवत्सरादेव गर्भं धत्ते मनोहरम्। अश्वत्थेराजवश्यार्थी जपेदग्नेः सुरूपभाक् ॥१६॥ पलाशमूले विद्यार्थी तेजोर्ध्वभिमुखो रवेः। कन्यार्थी चंडिकागेहे शत्रुहत्यै गृहे मम ॥१७॥ श्रीकामो विष्णुगेहे च उद्याने स्त्री वशा भवेत्। किमत्र बहुनोक्तेन शृणु सैन्येश तत्त्वतः ॥१८॥ यं यं काममभिध्यायेत्त तं प्राप्नोत्यसंशयम्॥ मम गेहगतस्त्वं तु तारकस्य वधेच्छया ॥१९॥ जपन् स्तोत्रं च कवचं तुलसीगतमानसः। मंडलात्तारकं हंता भविष्यसि न संशयः ॥२०॥ ॥इति श्री ब्रह्मांडपुराणे तुलसीमाहात्म्ये तुलसीकवचं नाम स्तोत्रं॥



## श्रीतुळशीची आरती

जयदेवी जयदेवी जय माये तुळसी॥ निजपत्राहुनि लघुतर त्रिभुवन हे तुळसी॥धृ०॥ ब्रह्मा केवळ मूळीं मध्यें तो शौरी॥ अग्रीं शंकर तीर्थे शाखापरिवारीं॥ सेवा करिती भावें सकळहि नरनारी॥ दर्शनमात्रें पापें हरती निर्धारीं॥ जयदेवी जयदेवी० ॥१॥ शीतळ छाया भूतळव्यापक तूं कैसी॥ मंजिरीची आवड कमळारमणासी॥ तव दलविरहित विष्णू राहे उपवासी॥ विशेष महिमा तुझा शुभ कार्तिकमासीं॥ जयदेवी जयदेवी० ॥२॥ अच्युत माधव केशव पीतांबरधारी॥ तुझें पूजनकाळीं जो हे उच्चारी॥ त्यासी देसी संतति संपत्ति शुभकारी॥ गोसावीसुत विनवी मजला तूं तारी॥ जयदेवी जयदेवी० ॥३॥

## श्रीकृष्णाची आरती

ओंवाळूं आरती मदनगोपाळा॥ श्यामसुंदर गळां वैजयंतीमाळा॥धृ०॥ चरणकमळ ज्याचे अति सुकुमार॥ ध्वजवज्रांकुश ब्रीदांचे तोडर ॥१॥ नाभिकमल ज्याचें ब्रह्मयाचें स्थान॥ ह्रदयीं पदक शोभे श्रीवत्सलांच्छन ॥२॥ मुखकमल पाहतां सूर्याच्या कोटी॥ मोहियलें मानस हरपली दृष्टी ॥३॥ जडित मुगुट ज्याचा देदीप्यमान॥ तेणें तेजें कोंदलें अवघें त्रिभुवन ॥४॥ एका जनार्दनीं देखियेलें रूप॥ रूप पाहों जातां झालें तद्रूप ॥५॥ ओंवाळूं आरती मदनगोपाळा॥ श्यामसुंदर गळां वैजयंतीमाळा॥

✲ ✲ ✲



# तुलसीमाहात्म्य

## वृंदावनातील तुळस

भारतीयांच्या सांस्कृतिक जीवनात पौराणिक, ऐतिहासिक, प्राचीन अर्वाचीन, मध्ययुगीन सर्व कालखंडांत आदरणीय ठरलेली वृंदावनातील तुळस हे एक पावित्र्याचे, सौभाग्याचे आणि मांगल्यमय जीवनाचे प्रतीक आहे. आसेतू हिमाचल कोणत्याही प्रदेशात संचार करा, गृहस्थांच्या घरा-घरांतून परसदारी वृंदावन, त्यात डुलणारी तुळस, निरांजनाने ओवाळून गृहिणी करीत असलेली पूजा, पुढे सडासंमार्जन करून घातलेली रांगोळी, असे मनोहारी प्रसन्न दृश्य दिसेल.

## तुळशीची उत्पत्ती

पौराणिक वाङ्मयात तुळशीच्या अनेक उत्पत्तिकथा आहेत. देवीभागवत या ग्रंथात शंखचूड-तुळसी विवाहकथा विस्ताराने दिली आहे ती अशी -

धर्मध्वज नावाच्या राजाची एक स्वरूपसुंदर कन्या होती. तिचे नाव तुलसी. तिने बदरीवनात विष्णूच्या प्राप्तीसाठी तप केले आणि ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले. वर मागताना ती म्हणाली, "मी पूर्वजन्मी वृंदावनातील गोपी होते. एके दिवशी मी श्रीकृष्णाबरोबर क्रीडा करीत असता राधेने पाहिले आणि मत्सरग्रस्त होऊन तिने मला शाप दिला, "तू मानवयोनीत जन्म घेशील." श्रीकृष्णाला हे समजताच वाईट वाटले. मग त्याने आश्वासन देऊन



सांगितले, "तुलसी, भिऊ नको. त्या मानवजन्मातही तुला माझी प्राप्ती होईल." ब्रह्मदेवाने हे ऐकून घेतले आणि वर देताना तो म्हणाला, "मानवजन्मात तुला विष्णूची प्राप्ती होईल. पण त्यापूर्वी तुला शंखचूड दैत्याची पत्नी व्हावे लागेल." कालांतराने तिला शंखचूड भेटला. त्याने गांधर्वविधीने तुलसीचे पाणिग्रहण केले. दोघांनी संसारसुख उपभोगले. शंखचूडाने तपस्या करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले होते व त्याला ब्रह्मदेवाकडून अभंग कवच मिळाले होते. त्यामुळे तो अमर झाला होता.

पुढे शंखचूड उन्मत्त होऊन त्याने देवलोकावर स्वारी करून देवांचा पराभव केला. सर्व देव महादेव शंकराकडे जाऊन प्रार्थना करू लागले, "शंखचूड दैत्याचे पारिपत्य करा." भगवान शंकराने शंखचूडाचे पारिपत्य करण्यासाठी त्याच्याशी युद्ध सुरू केले, पण शंखचूड काही केल्या मरेना. तुलसीच्या पातिव्रत्याच्या प्रभावाने तो अजिंक्य व अमर झाला होता. मग विष्णूने कुटिल नीतीचा प्रयोग करून स्वतः शंखचूडाचे रूप घेऊन तुलसीचे पातिव्रत्य भंग केले. त्यामुळे शंखचूडाच्या गळ्यातील अभंग कवच भंगले आणि तो ठार झाला. पतीचे रूप घेऊन विष्णू आला आहे हे त्या पतिव्रतेला नंतर उमगले. त्या वेळी तिने शाप दिला, "तू पाषाणरूप होशील." विष्णूने तिला समजून सांगितले व म्हणाला, "यापुढे तुला दिव्य देह मिळेल. तू मला लक्ष्मीइतकीच प्रिय होशील. तुझ्या तडकलेल्या शरीरातून गंडकी नदी उगम पावेल. तुझ्या केसांतून एक झाड उगवेल, त्यालाच लोक तुलसी म्हणतील व त्याची पूजा करतील. तू मला पाषाण होण्याचा शाप दिला आहेस, त्याप्रमाणे मला गंडकीच्या तीरावर शाळीग्राम होऊन राहावे लागेल. त्या पाषाणालाच लोक माझे प्रतीक मानतील व त्याची पूजा करतील, त्यावर तुलसीपत्र वाहतील. तुझ्या पतीचा महादेवाने वध केला असला तरी तो शंखाच्या रूपाने माझ्या पूजेत स्थान मिळवील. त्या शंखातून पाणी घातल्याने मी प्रसन्न होईन." शंखातून पाणी घालण्याची प्रथा देवपूजेत आढळते ती त्यामुळे.

सागरमंथनाच्या वेळी अमृताचे काही थेंब भूतलावर उडाले, त्यामधून जे वृक्ष तयार झाले ते तुळशीवृक्ष होत, अशी दुसरी एक कथा आहे त्यासंबंधी एक श्लोक असा -

**तुलस्यमृतजन्मासि सदा त्वं केशवप्रिये।**
**केशवार्थे विचिन्वामि वरदा भव शोभने॥**

(अमृतातून जन्माला आलेल्या हे तुलसीदेवी, केशवपूजेसाठी, तुझी दले मी खुडीत आहे. हे शोभने, मला तू वर देणारी हो.)

पद्मपुराण, शिवपुराण यांतही तुलसीजन्माच्या कथा अहेत. त्या कितीही असोत, सर्व ठिकाणी तुलसीचे माहात्म्य, पावित्र्य यांचे वर्णन मुक्तकंठाने केलेले आढळते. हे माहात्म्य किती विविध प्रकारांनी वर्णिलेले आहे ते समजले म्हणजे तुळशीला अनन्यसाधारण स्थान कसे प्राप्त झाले ते कळून येते.

## तुलसीविवाहाची कथा

सर्व देवादिकांना जिंकून त्यांचे वैभव आपणाकडे आणणारा, जालंधर नावाचा एक महापराक्रमी योद्धा होऊन गेला, त्याने सर्व देवांना जिंकून त्यांचे सर्व वैभव आपल्याकडे आणून ठेवले होते. तो इतका विजयी योद्धा कसा झाला? त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्याची पत्नी वृंदा ही महापतिव्रता होती. जालंधराचा नाश व वृंदेचे पातिव्रत्य भंग करण्याचे कपट श्रीविष्णूंनी रचले होते. ते कपटनाटक जालंधराची स्त्री महापतिव्रता वृंदा हिला कळून आल्यावर ती संतप्त होऊन श्रीविष्णूस म्हणाली, "तुला पत्नीवियोग प्राप्त होईल व तो नष्ट करण्यासाठी दोन माकडांचे साहाय्य घ्यावे लागेल." (ही गोष्ट रामावतारात घडून आली.) नंतर तिने विष्णूच्या कपटाला बळी पडल्यामुळे चिताप्रवेश केला. विष्णूला तरीही तिच्याविषयी प्रेम आवरता आले नाही. तो तिच्या चितेजवळ बसून राहिला. त्यामुळे देवांना काळजी उत्पन्न झाली. देवांनी महादेवाला यावर उपाय विचारला. महादेव म्हणाला की, तुम्ही महामायेला शरण जा. देवांनी तसे केले. त्याच क्षणी महामाया प्रकट होऊन



देवांना म्हणाली, "तुम्ही, पार्वती, लक्ष्मी आणि सरस्वती या तीन देवींना शरण जा." देवांनी त्या तिन्ही देवींची स्तुती करताच त्या प्रकट होऊन म्हणाल्या "देवहो! आम्ही देतो ती तीन बीजे घ्या आणि वृंदेच्या चितेवर पेरा म्हणजे तुमचा कार्यभाग होईल." त्याप्रमाणे देवांनी केल्यावर त्या तीन बीजांपासून धात्री, मालती आणि तुलसी अशी तीन रोपे उगवली. तुलसी व धात्री यांनी विष्णूकडे प्रेमाने पाहिले म्हणून त्या दोघी त्याला प्रिय झाल्या. तुलसीचे रोपटे हे वृंदेचे प्रतीक मानून ते घेऊन विष्णू वैकुंठात गेला. पुढे त्या वृंदेने रुक्मिणीचा अवतार घेऊन श्रीकृष्णास कार्तिक महिन्यात शुद्ध द्वादशीस वरिले.
(पद्म पुराण व शिवपुराण)

## तुळशीमाहात्म्य

विष्णूला तुळस फार प्रिय आहे. जोपर्यंत तुळशीपत्र मिळालेले नसते तोपर्यंत फुले व मोत्यांचे हार त्याला प्रिय असतात. यासंबंधी पद्मपुराणात सुंदर श्लोक आहे -

**तावत् गर्जन्ति पुष्पाणि तथा मुक्तामयानिच।**
**यावन्न प्राप्यते पुण्या तुलसी विष्णुवल्लभा॥**

अर्थ: श्रीकृष्णाला प्रसन्न करून घ्यायचे असेल तर एक तुळशीपत्र पुरे.

तुळशीचे रोप वृंदावनात लावावे, वाढवावे त्यामुळे श्रीकृष्णप्रेम भक्तांच्या हृदयसंपुटात वाढते. श्रीकृष्णाच्या चरणकमलांवर तुळशीदले वाहिली म्हणजे ती भक्ताला सर्वश्रेष्ठ अशी सायुज्यमुक्ती मिळवून देतात. तुळशीचे वर्णन करताना भक्त तिला विविध नावांनी संबोधतात. वृन्दा, वृन्दावती, विश्वपूजिता, विश्वपावनी, पुष्पसारा, नन्दिनी, तुळशी, कृष्णजीवनी ही सर्व तुळशीची नावे असली, तरी कृष्णजीवनी या नावाने ती कृतार्थ होते. पतिव्रतेचा जन्म पतीचे जीवन उज्ज्वल करण्यात सार्थकी लागतो. तुळस ही त्यामुळेच कृष्णजीवनी आहे. पतिव्रतांचे मांगल्य, तेज, पावित्र्य सर्व तिच्या ठायी असते. तुळशीचे केवळ दर्शन पापनाशक आहे व तिची पूजा मोक्षदायक आहे. ती

वृंदावनवासिनी विष्णूची परमप्रिया आहे म्हणून विष्णूने तिला आपल्या पूजेत अग्रस्थान दिले. तुळशीशिवाय विष्णूची पूजा व्यर्थ ठरते -

**मणिकांचन पुष्पाणि तथा मुक्ताभयानिच।**
**तुलसीदल पत्रस्य कला नार्हन्ति षोडशीम्॥**

सुवर्णाची, रत्नांची आणि मोत्यांची फुले विष्णूला वाहिली तरी त्यांना तुळशीपत्रांच्या सोळाव्या कलेचीही सर येणार नाही.

गयेस विष्णुपदाचे दर्शन घेताना मला त्याचा प्रत्यय आला. आम्ही काही यात्रेकरूंनी विष्णूपदांवर वाहण्यासाठी सुवर्ण-तुळशीदले नेली होती, पण तेथील पंड्यांनी तुळशीदलांचे महत्त्व पटवून दिले आणि कृष्ण तुळशीची टोपलीभर खुडलेली पाने वाहण्यासाठी सादर केली. त्यांचे लक्ष सुवर्ण-तुळशीपत्राकडे होते हे वेगळे.

तुळशीदलांचे माहात्म्य दर्शविणारे काही संकेत भारतीयांच्या जीवनात किती प्रकारे रुजले आहेत तेही पाहण्यासरखे आहे.

तुळशीदल ठेवल्यावाचून किंवा तुळशीपत्राने प्रोक्षण केल्यावाचून नैवेद्य शुद्ध होत नाही. भगवान विष्णूला नैवेद्य दाखविताना नैवेद्यावर तुळशीपत्र ठेवले जाते, त्याशिवाय नैवेद्य भक्षण करू नये. विष्णूला ते आवडत नाही. तुळशीच्या झाडाचे दर्शन, स्पर्श, ध्यान, नमन, पूजन, रोपन व सेवन हे सर्व पवित्र व पापक्षय करणारे आहे. वैष्णव लोकांत तुळशीचे माहात्म्य विशेष आहे.

## संस्कृतीचे प्रतीक

तुळस ही एक वनस्पतिदेवता आहे व तिच्या ठिकाणी मुळापासून अग्रापर्यंत देव वास करतात अशी भावना असते. म्हणून गृहिणी तुळशीची पूजा करताना प्रार्थना करतात, "हे तुळशीदेवते, तुझ्या पाळामुळांत पृथ्वीवरील सर्व क्षेत्रे सामावलेली आहेत. तुझ्या खोडात सर्व देवतांचे निवासस्थान आहे. तुझ्या शाखांच्या अग्रावर वेदपुराणे वास करीत आहेत. अशा तुझ्या सर्वव्यापी रूपाला माझा नमस्कार असो." तुळस ही प्रत्येक गृहिणीला आपली सखी वाटते. वृंदावनापाशी बसावे आणि मुक्तकंठाने आपले



हृद्गत तिला सांगावे, तिच्याशी गुजगोष्टी कराव्या, तिला आळवावे, तिच्याजवळ मागणे मागावे, गाणी गावी. भक्तिभावाने गाणे गाणारी ही एक गृहिणी काय गाणे गाते पाहा - काय मागते पाहा!

**तुळस वंदावी माउली।**
**तुळस संताची साउली ॥१॥**
**तुळसीला पाणी घाली। तुळस कोंवळी।**
**पुत्र मागते सावळी। उषाताई ॥२॥**
**तुळशी ग माये। तुझ्या मंजुळ्या झळकती।**
**तेथे कृष्णनाथ खेळती। सारीपाट ॥३॥**
**तुळसी ग बाई। जन्म अमृतमंथनी।**
**बैस अंगणांत। जागा देते वृंदावनी ॥४॥**
**काशी काशी म्हणून। सर्व भारती धांवत।**
**काशी माझे अंगणांत। तुळसादेवी ॥५॥**

## तुलसी स्नान मंत्र

गोविंदवल्लभादेवी भक्तचैतन्यकारिणीम्।
स्नापयामि जगद्धात्री विष्णुभक्तिप्रदायिनीम्॥

## तुलसीदर्शन मंत्र

वृन्दायै तुलसीदेव्यै प्रियायै केशवस्य च।
विष्णुभक्तिप्रदे देवी सत्यवत्यै नमो नमः॥

## तुळशीला पाणी घालते वेळी म्हणावयाचा श्लोक

तुळसी तुळसी ऋषीकेशी।
मंत्र जपी एकादशी॥

तुळस नव्हे तुंच काशी। काशी परास अधिक॥
अमृताच आळ। उतरल कोटीस कुळं॥
तुझ्या मुळाची माती। कुंकू लागे लल्हाटी॥
साधन करीन कृष्णाचं। दुःख नाही हरी जन्माचं॥
माता पिता भ्रतारी। तुळसी आहे मातोश्री॥
तीर्थ घ्यावे तुळसीचे। पातक जाते जन्माचे॥
बंधन तोडत यमाचं। तुळस भेटली भ्रांत॥
वाटली कृष्णा सहित। द्वारका भेटली॥

तुळशीचे वृंदावन हीच तिची काशी, हेच तिचे पुण्यक्षेत्र. ही गृहिणी सांजसकाळ निरांजने ओवाळते, पाणी घालते, नैवेद्य दाखविते, तुलसीदल भक्षण करते व म्हणते -

तुळशी श्रीसखी शुभे पापहरिणी पुण्य दे।
नमस्ते नारदनुते नारायण मनःप्रिये॥

तुळशीला प्रदक्षिणा घालाव्या. प्रत्येक पावलागणिक भक्ताला अश्वमेध यज्ञाचे फळ मिळते.

तुळशीचे झाड हे अत्यंत पवित्र मानल्यामुळे मासिक पाळीच्या वेळी स्त्रिया तुळशीला स्पर्श करीत नाहीत. तसे केल्याने तुळशीचे झाड वठते. या वृक्षदेवतेला अपवित्रता चालत नाही. तुळशीपत्रे भलत्या वेळी खुडू नयेत, यासंबंधीही शास्त्रवचन आहे. पौर्णिमा, आमावास्या, रात्रीच्या वेळी, झोपी गेल्यावर, दोन्ही संध्यासमयी, द्वादशीस, संक्रांतीस, मध्यान्हकाळी, पारोशाने अगर अशौच असताना तुळशीदले खुडू नयेत. जो अवेळी तुळशीपत्रे तोडतो तो श्रीहरीचे मस्तकावर आघात करतो, असे सांगितले आहे. मंगलप्रसंगी पूजासाहित्यात तुळशीदले अत्यावश्यक आहेत. तीन दिवसांची शिळी



तुळशीपत्रेही शुद्धच मानली आहेत. वेदापेक्षा तुळशीचे महत्त्व जास्त वाटणारा एक कवी म्हणतो -

पुष्पेशु तुलनाःयस्या नास्तिःवेदेषु भाषिताम्।
तुलसीपुष्पसारां च सतीं पूजां मनोहराम्॥

वारकरी स्त्रिया पितळी तुळशीवृंदावन मस्तकी धारण करून पालखीबरोबर पंढरीची वारी करतात. विठ्ठलाला तुळस भेटवतात. तुळशीमाळा घालतात.

## तुळशीची माळ

विष्णू, कृष्ण अथवा विठ्ठल या देवतांच्या पूजेच्या वेळी तुळशीची माळ गळ्यात घालतात. वारकरी पंथाची दीक्षा घेणाऱ्याला निराळी शपथ घ्यावी लागत नाही. पंढरीची वारी, गळ्यात तुळशीमाळ परिधान केली की तो पंथाचा अनुयायी झाला. तुळशीची माळ सदैव गळ्यात धारण करणे हे पवित्र मानले आहे.

तुलसीकाष्टनिर्माणमालां गृहणन्ति ये नराः।
पदे पदेऽश्वमेधानां लभन्ते निश्चितं फलम्॥ (ब्रह्मवैवर्त पुराण)

तुलसीवृंदावनातील मृत्तिका विभूतीप्रमाणे मस्तकी धारण करतात. प्रवासाला निघताना तुळशीला उजवी घालून जाणे शुभदायक मानले आहे.

केरळातील नायरांच्या घराघरांतून तुळशीवृंदावन असतेच. हे लोक तुळशीच्या फांदीवर पाणी ओतून ते तीर्थ म्हणून प्राशन करतात. स्नानानंतर तुळशीची मंजिरी आपल्या उजव्या कानावर खोचून ठेवतात. केरळ प्रांतात तुळस शिवालाही प्रिय आहे असे मानले जाते.

## तुलसीविवाह

पेशवाईच्या काळात तुलसीविवाह थाटाने साजरा केल्याची वर्णने आहेत. मध्य भारतात ओर्चा संस्थानचा राजा दरवर्षी अत्यंत थाटाने तुलसीविवाह साजरा करीत असे. तो या सोहळ्याप्रीत्यर्थ सालिना तीन लक्ष रुपये खर्च करी. विवाहाच्या वेळी जी वऱ्हाडी मिरवणूक निघे त्यात आठ हत्ती, बाराशे

उंट, सहा हजार घोडेस्वार, संपूर्ण पायदळ, दरबारी मानकरी यांचा समावेश असे. लवाजम्याच्या अग्रभागी शृंगारलेला हत्ती असे. त्या हत्तीवर अंबारीत शाळिग्राम मूर्ती नवरदेव म्हणून विराजमान होई. सर्व मिरवणूक लवाजम्यानिशी वाजतगाजत मंदिरातील वृंदावनाकडे जाई. मंदिरात गेल्यावर शाळिग्राम अणि वृंदावनातील तुळस यांचा विवाह-समारंभ यथाविधि थाटाने साजरा होई. नवरदेव रात्रीच्या विश्रांतीसाठी लुधौरा येथे राही. या विवाहसमारंभाला सुमारे एक लक्ष प्रजाजन उपस्थित असत. विवाहसमारंभाप्रीत्यर्थ राजा आपल्या सर्व प्रजाजनांना सुग्रास भोजन देई. असा हा तुळशीचा थाट!

रुक्मिणी तुळशीदलाचे महत्त्व पूर्णपणे ओळखून होती. एका पारड्यात उंची अलंकर रत्ने घातली व दुसऱ्या पारड्यात केवळ तुळशीपत्र ठेवून तिने श्रीकृष्णाला वश करून घेतले होते-

रुक्मिणीने एका तुळसीदलाने 'गिरिधर प्रभू तुळिला' असे या प्रसंगाचे वर्णन कवीने केले आहे.

## तुलसी उपनिषद

तुळशीसंबंधी एक उपनिषद असून नारद हा त्याचा कर्ता आहे. तुळस ही अमृतदेवता, भक्तिवसुधा व कीलक नारायण आहे. या उपनिषदात तुळशीचे वर्णन श्यामवर्णा, ऋगयजुःस्वरूपा, अमृतोद्भवा, विष्णुवल्लभा, जन्म-मृत्यू विनाशकारी असे केले आहे. तुळशी प्रदक्षिणेने दारिद्र्य नष्ट होते. तिच्या मुळांत सर्व तीर्थे, मध्यभागी ब्रह्मा, अग्रभागी वेदशास्त्रे, विष्णू तिच्या मुळांशी व लक्ष्मी तियेत वास करते. यज्ञ, दान, जप, देवपूजा, श्राद्ध इत्यादी कृत्ये तुळशीदलावाचून केल्यास ती निष्फळ ठरतात.

तुळशीसंबंधी गायत्रीमंत्रही आहे तो असा-

**श्रीतूलस्यै विद्महे। विष्णुप्रियायै धीमहि।**
**तन्नो अमृता प्रचोदयात्॥**



तुळशीच्या मण्यांची माळ विष्णूच्या प्रसन्नतेसाठी भक्ताने कंठात सदैव धारण करावी. कार्तिक महिन्यात ही माळ परिधान करून प्रार्थना करावी-

**तुळशीकाष्ठसम्भूते माले कृष्णजनप्रिये।**
**बिभर्मि त्वामहं कण्ठे कुरुमां कृष्णवल्लभम्॥**

(हे माले, तू तुळशीकाष्ठाची बनलेली असून वैष्णवांना प्रिय आहेस. मी तुला कंठी धारण करतो. मी कृष्णाला प्रिय होईन असे तू कर.)

## तुलसीपत्र लक्षपूजा

हे एक व्रत आहे. या व्रतात एक लक्ष तुळशीपत्रे खुडून विष्णूची पूजा करतात. या पूजेत पहिल्या दिवशी जितकी तुळशीपत्रे पूजेसाठी घेतलेली असतील तितकीच पुढे दरदिवशी घेऊन लक्ष संख्या पुरी करावयाची असते. ही तुळशीपत्रे सलग असावीत. किडकी, अस्वच्छ फाटकीतुटकी असू नयेत. जितकी तुळशीदले रोज वाहिली असतील तितक्याच वातींनी देवाची आरती करतात.

## तुलसी लक्ष प्रदक्षिणा

चतुर्मासात तुळशीला लक्ष प्रदक्षिणा घालण्याचेही एक व्रत आहे. प्रदक्षिणा घालून झाल्यावर तिची आराधना करताना म्हणतात-

हे तुळशी, तू श्यामवर्ण, कमललोचन, प्रसन्न, चतुर्भुज, दोन्ही हातांत पद्म व कमळे धारण करणारी, दोन हात वरद व अभय मुद्रेत ठेवणारी, किरीट, हार, केयूर, कुंडल इ. अलकारांनी सजलेली शुभ्रवस्त्रा, पद्मासनस्था अशी आहेस, तुला मी नमस्कार करते. तू मला प्रसन्न वरदायिनी हो.

## स्त्रियांनी शाळिग्रामाची पूजा का करू नये?

हा प्रश्न मला अनेकांनी विचारला. आपणाला पुष्कळदा संकेत तेवढे माहीत असतात. पण उपपत्ती ठाऊक नसते. त्यामुळे 'बाबा वाक्यं प्रमाणाम्' या गतानुगतिक वृत्तीने आचार केले जातात. त्यांपैकी शाळिग्रामाची पूजा

स्त्रियांनी करू नये हा एक दंडक आहे. त्या संबंधीची एक कथा आहे. ती समजली म्हणजे या प्रथेबद्दलचा खुलासा होतो. ती कथा अशी :

भगवान विष्णूंनी नवग्रहांची निर्मिती करून त्यांना मानवी जीवनावर प्रभुत्व गाजविण्यास सांगितले. पडत्या फळाची आज्ञा शिरसावंद्य मानून सर्व ग्रह सरसावले. त्यात शनिग्रह अग्रगण्य होता. त्याने आपली सत्ता मानवी जीवनावर गाजविण्यापूर्वी प्रयोगादाखल ब्रह्मदेवालाच आपला शिष्य होण्याची आज्ञा केली! ब्रह्मदेवांनी हा तुझा पहिला प्रयोग विष्णूवर कर अशी विनंती केली. शनिग्रहच तो. आपल्या मागे हा ग्रह लागणार हे वृत्त विष्णूंना समजताच त्यांनी पलायन केले आणि गंडकी नदीच्या तीरावर ते पर्वतरूपाने पडून राहिले. शनी पाठलाग करीतच होता. त्याही स्थितीत शनीने आपला प्रभाव दाखविण्याचे ठरविले. शनिग्रहाने भुंग्याचे रूप धारण करून पर्वतरूपी विष्णूचे शरीर पोखरण्याचे काम चालू ठेवले. त्याला अनेक छिद्रे पाडली. शनीच्या पोखरण्यामुळे पाषाणाचे जे लहान तुकडे गंडकीमध्ये पडले तेच शाळिग्राम या नावाने प्रसिद्धीस आले. बारा वर्षांची मुदत संपली. शनिग्रहाचा प्रताप सहन केल्यावर भगवान विष्णूने आपले पूर्वस्वरूप धारण केले आणि लोकांना सांगितले, ''गंडकी पर्वत हे माझेच स्वरूप आहे. माझ्यापासून घडलेल्या लहान-लहान पाषाणांची तुम्ही शाळिग्राम म्हणून पूजा करावी.''

खऱ्या शाळिग्रामाला छिद्र असते. त्यात भुंग्यासारखा प्राणी असतो व तो पाषाण कोरीत असतो. शाळिग्राममूर्तीतून सुवर्ण अथवा सुवर्णाची तुळशीदले निघतात. शाळिग्रामाच्या अंतर्भागात जो प्राणी असतो तो फक्त तुळशीदले खातो. म्हणून शाळिग्रामाला तुळस वाहण्याची प्रथा सुरू झाली. हाच किडा तुळशीची पाने खाऊन सुवर्ण निर्माण करतो. असे सुवर्ण सतत मिळत राहावे म्हणून त्या किड्यासंबंधी पथ्य सांभाळणे आवश्यक आहे. या किड्याला रजःस्वला स्त्रीचा स्पर्श झाला तर तो त्वरित मरण पावतो आणि सुवर्णनिर्मिती बंद होते. स्त्रिया पूजन करीत असता असा प्रसंग उद्भवला तर तो किडा मरेल.



यासाठी सावधगिरी म्हणून 'स्त्रियांनी शाळिग्रामाची पूजा करू नये' असा नियम पूर्वीच्या काळी शास्त्रकारांनी केला असावा.

प्राचीन काळी तुळशीच्या रसापासून सुवर्ण निर्माण करण्याची कला कित्येकांना अवगत होती. असे देवीकोशकारांनी देवीकोशात नमूद केले आहे.

उजव्या बाजूचा शंख, एकाक्षी रुद्राक्ष मिळणे कठीण, तसा अस्सल शाळिग्राम सहजासहजी मिळत नाही. काही वेळा शाळिग्रामाचे मूल्य तीन हजार रुपयांपर्यंत केले जाते. शाळिग्रामाची तुळशीदलाने नित्य पूजा करणारा दरिद्री राहत नाही. परंतु त्यासाठी कडक सोवळ्याचे आचरण करावे लागते.

तुळशीचे सांस्कृतिकदृष्ट्या व धार्मिकदृष्ट्या महत्त्व आपण पाहिले. पण घरोघरी तिची वृंदावनात स्थापना व्हावी व पूजा व्हावी यासाठी तिच्या अंगी आणखी काही महत्त्वाचे गुणधर्म असले पाहिजेत व म्हणूनच भारतीय संस्कृतीच्या निर्मात्यांनी हे गुण शोधले व तेही बहुमोलाचे आहेत असे आढळून आले.

## तुळशीचे औषधी उपयोग

तुळस ही एक वनस्पती आहे. तिचे नाव या वनस्पतिशास्त्रात 'ऑसिमम् बॅसिलिकम बेसिल' असे आहे. हे झाड नव्हे. ते रोप किंवा रोपटे आहे. याची उंची दोन-तीन हात असते. काळी व पांढरी अशा हिच्या दोन जाती आहेत. रानतुळस ही निराळी जात आहे. तुळशीला उभ्या मंजिऱ्या येतात. या मंजिऱ्यांतच तुळशीची बारीक-बारीक फुले असतात. पाने व मंजिऱ्या देवपूजेत उपयोगात आणतात. कृष्णतुळशीची पाने सुवासिक असतात.

तुळशीच्या झाडाने भोवतालची हवा रोगरहित होते. तुळशीचा चहा ज्वरावर देतात. विषमज्वरात काळ्या तुळशीच्या रसात मिरपूड घालून द्यावी असे वैद्यकशास्त्र सांगते. विंचवाच्या दंशावर, गजकर्णावर तुळशीच्या पानांचा रस चोळतात.

तुळशीच्या काळ्या बियांचा आणि पानांचा स्वरस औषधात वापरतात. ३० ते ६० थेंब रस घेऊन त्यात मध घालून जे मिश्रण होते त्यास कल्प असे म्हणतात.

तुळशीचे गुणधर्म वर्णन करणारा श्लोक पाहा -

**तुलसी कटुका तिक्ता हृद्योष्णा दाहपित्तकृत्।**
**दीपनी कृष्टकृच्छास्त्रा पार्श्वरुक् कफवातजित्॥**

तुळशीरसात तिक्त व कटू असे दोन प्रकार आहेत. त्यांपैकी कटू रसप्रधान असून विपाक कटूच होतो. त्यामुळे वीर्य उष्ण होते. कटुरस व उष्ण वीर्य यामुळे पित्ताची वृद्धी होते. त्याचबरोबर कफवातनाशाचेही कार्य होते. शीतता कमी करून उष्णता वाढवणारी ही वनस्पती आहे. हिच्या गंधाने दुर्गंधी दूर केली जाते. शीतज्वर, कफज्वर झाला म्हणजे स्वरसाचा उपयोग करतात.

सर्दी, पडसे, खोकला, डोकेदुखी, अंगदुखी, पोटदुखी इत्यादी विकारांत तुळशीचा उपयोग होतो. हिच्या रसाने जीभ स्वच्छ होऊन उत्तमपैकी भूक लागते. ताप आला असता तुळशीचा काढा घ्यावा. घाम येऊन ताप उतरतो. छातीत कफ दाटला असता तुळशीचा रस मधातून दिल्यास कफ सुटू लागतो. छाती हलकी होते. तुळशीचा रस मधात घालून चाटला असता उचकी कमी होते. तुलसी ही पार्श्वशूलाहार आहे. म्हणून तुळशीचा रस पोटात देतात व बाहेरूनही लावतात. पोटशूलामध्ये तुळशीचा रस तुपाबरोबर पोटात देतात. डोकेदुखीत या रसाचे दोन थेंब नाकात घालतात. तुळस ही जंतुघ्न व कुष्ठघ्न आहे. गजकर्ण, नायटे यांवर स्वरस चोळल्यास कीड मरते.

तुळशीच्या बियांची दुधात केलेली लापशी शरीराला फार थंडावा आणते. त्यामुळे मूत्रमार्गाची आग कमी होते. शरीराला विषबाधा झाली असता या लापशीचा चांगला उपयोग होतो. दुधात साखर घालून त्यात तुळशीचे बी शिजवून लापशी केली म्हणजे ती साबूदाण्याच्या खिरीसारखी गोड लागते.

तुळशीतील माती ही औषधी आहे. ठणका लागल्यास, सूज आल्यास वृंदावनातील तुळशीच्या मुळांजवळील ओल्या मातीचा लेप दिल्यास सूज उतरते, ठणका थांबतो.



अशी ही तुळस बहुगुणी, आखुड शिंगी, बहुदुधी कामधेनूसारखी आहे.

संस्कृत भाषेने तुळशीला पवित्रा, सुखवल्लरी, पूर्णसा, दिव्या या नावांनी गौरविले आहे. भारतीय संस्कृतीची प्रतीके आसेतुहिमाचल सर्वत्र दृष्टीस पडतात. हिंदीत तिला तुलसी, वृंदा म्हणतात. बंगालीत काला तुलसी, कानडीत कृष्ण तुलसी, तमिळ भाषेत असागाई, मल्याळम्‌मध्ये निलानिर्तुआ, ब्राह्मीत लून गागोरा भाषेत चेन्तु, सिलोनीत मुदुरुतुल्ला अशी नावे आहेत. त्यावरून ती सर्वव्यापी आहे. केवळ भारतातच नव्हे तर सिलोन, ब्रह्मदेश, मलाया, ऑस्ट्रेलिया, पश्चिम आशिया, अरेबिया इ. उष्ण कटिबंधांतील देशांत तुळशीची लागवड केली जाते.

वनस्पतिशास्त्रात तिला ऑसिमम् सँक्टम (फॅमिली लॅबीएटी) हे नाव आहे.

भारत हा पूजाप्राधान देश असल्यामुळेच या देशात देवादिक, अवतारी महापुरुष, यक्ष, पशू, पक्षी, वृक्ष-वल्लरी यांना पूजनीय मानले आहे. या प्रत्येकामागे एक सांस्कृतिक परंपरा आहे. तुळस या वनस्पतीची परंपरा अशीच प्राचीन काळापासून आजतागायत राखली गेली आहे. पाँडिचेरी येथील श्रीअरविंद यांच्या समाधि-चबुतऱ्यावर विविध पुष्पांची रचना करतात. पण तीर्थ म्हणून तबकात पवित्र जल व तुलसीदल ठेवलेले असते. ते प्राशन केले की साधकाला धन्य वाटते. सत्यनारायणाच्या तीर्थात तुलसीदल असते. हिंदूंच्या आणि पर्यायाने भारतीयांच्या घराघरांतून आजही तुळस ही देवता कल्पून तिची पूजा केली जाते. स्वतःच्या घरी, बंगल्याच्या परसदारी प्रशस्त अंगणात वृंदावनात डुलणारी तुळस दृष्टीस पडते. पण ज्यांना स्वतःचे निवासस्थान नाही असे अनेक लोक भाड्याच्या घरातील तुटपुंज्या जागेतदेखील कुंड्यांतून, डब्यांतून तुळशीच्या रोपाची जोपासना करून तिची पूजा करतात. इतर कोणतीही फुलझाडे नसली तरी तुळस ही असलीच पाहिजे असे हिंदू मन सांगत असते. त्यातल्या त्यात घरातील गृहिणीची तर तुळस ही

देवता जिवलग सखी झालेली असते. भारतीयांच्या सांस्कृतिक जीवनात तुळशीचे स्थान असे रम्य, पवित्र, मंगलमय व अढळ आहे!

जीवनात अमर कोण आहे? मृतांची स्मृती अनेक प्रकाराने जतन केली जाते. पण भारतीय स्मृती तुलसीवृंदावनाच्या रूपाने जागृत ठेवतात. म्हणून अनेक समाधिस्थानी तुळशीवृंदावनाची योजना केली जाते. घरादारावर तुळशीपत्र ठेवणे, सर्वसमर्पण, श्रीकृष्णचरणी समर्पण याचा अर्थ त्याग, निवृत्ती हा आहे, असे भारतीय मानतो. 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र', 'भांगेत तुळस' या म्हणींमधून ती दैनंदिन परिभाषेत आलेली आहे.

वृंदावनात डुलणारी तुळस दृष्टीस पडली म्हणजे सश्रद्ध मन प्रसन्न होते, भावना उचंबळून येतात आणि मग वृंदावनातील तुळशीपुढे तबकात निरांजने पाजळून तुळशीला ओवाळणारी, तिची मनोभावे पूजा करणारी, तिचे तीर्थ घेणारी आणि डोळे मिटून अनन्यभावे प्रार्थना करणारी सुवासिनी उभी राहते.

कार्तिक महिना सुरू झाला की, तुळस नववधूसारखी डुलते, लाजते, मंजिऱ्यांच्या अलंकारांनी नटून-थटून आपल्या प्रिय बाळकृष्णाच्या भेटीस आतुर होते. मग कार्तिक द्वादशी ही तिथी येते आणि तिचे आसुसलेले मन बाळकृष्णाबरोबर विवाह झाल्याने स्थिरावते. तुळशीच्या छोट्या-छोट्या हातांत कंकणे विराजमान होतात. गळ्यात मंगळसूत्र व कार्पास वस्त्र, हळदकुंकू ही सौभाग्यलेणी वैभवाने मिरवणारी नववधू बाळकृष्णासह लक्ष्मीनारायणस्वरूपात भक्तांना दर्शन देऊन पावन करते आणि म्हणते, "बंधूंनो आणि भगिनींनो, वृंदावन ही कृष्णाची लीलाभूमी. या प्रिय भूमीत मी वावरते. म्हणून मी वृंदावनातील तुळस झाले आणि या कृष्णसख्याला वरिले. माझ्यासारखा संसार करा, सुखी व्हा, आयुष्यमान व्हा, आणि मी जसे बाळकृष्णाच्या चरणी आपले सर्वस्व वाहिले तसे तुम्ही त्या गोपाळकृष्णाच्या चरणी रत व्हा."

* * *




आमच्या येथे सर्व प्रकारची धार्मिक, आध्यात्मिक, ज्योतिष व शालेय पुस्तके तसेच नविन वर्षाच्या दिनदर्शिका व डायऱ्या होलसेल व किरकोळ दराने मिळतील.

# तुकाराम बुक डेपो

१७/ सी.पी.टँक रोड, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.
दुरध्वनी : २२४२१६८९/ २२४०५७९८

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com